# मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे शिबिर

**चारकोप (बातमीदार) :** सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला हातभार लागावा म्हणून मराठी वृत्तपत्र लेखक संघातर्फे नुकतेच शिबिर घेण्यात आले. दादर पूर्व येथील शिंदेवाडी महापालिका शाळेत झालेल्या संघाच्या कार्यालयामध्ये 'शेअरबाजार ओळख आणि गुंतवणूक' या विषयावर अर्थतज्ज्ञ दिलीप सामंत, 'सामाजिक कार्यात युवकांचा सहभाग' या विषयावर तानाजी गायकवाड, 'वृत्तपत्र लेखन का आणि कसे करावे' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार वसंत सोपारकर आणि 'मासिकांचे संपादन आणि जाहिरातीचे मार्ग' या विषयावर बबनराव पाटील यांची व्याख्याने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघाचे कार्याध्यक्ष नारायण परब यांनी, तर सूत्रसंचालन रमेश सांगळे यांनी केले. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ गिरीश वासुदेव यांनी केले.